# संन्याशाच्या डायरीतून

## हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी



स्वामी रामानन्द तीर्थ

अनुवाद
वि. पां. देऊळगावकर

# प्रास्ताविक

अनेक मित्रांचा आग्रह असूनही मी या आठवणी लिहावयास प्रवृत्त होऊ शकलो नाही. प्रत्यक्ष त्या घटना घडून आज प्रदीर्घ काळ लोटला आहे. आणखीही कारणे आहेत. पहिली गोष्ट अशी की, तसे काही लिहून काढावे अशी आंतरिक ओढ मला वाटली नाही. तसे लिहिण्यासारखे शेवटी आहेच काय मुळी? ते सगळे इतके महत्त्वाचे व अर्थपूर्ण काय आहे? याबद्दल मी साशंक होतो. मला ते पटत नव्हते. दुसऱ्या एका विचारानेही मी बराच त्रस्त होतो. आता ज्या स्वरूपाचे काम मी अंगीकारले आहे तशा स्वरूपाच्या कामात वैयक्तिक भाग प्रकट होणे अपरिहार्य असते. मानवी प्रयत्नांना तेवढे साध्य होईल तेवढ्या प्रमाणात तरी मी वैयक्तिक भाग टाळू इच्छीत होतो. म्हणून लिहिण्याचे टाळण्याकडेच कल होता व तो काही काळ टिकला. पण साऱ्या भारतातील मित्र व सहकारी माझी कोणतीही सबब ऐकायला तयार नव्हते. शेवटी ते जिंकले.

माझ्या या आठवणी नुकत्याच घडलेल्या इतिहासासंबंधीच्या आहेत. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेच्या या आठवणी आहेत. भारतीय स्वातंत्र्याची शेवटची लढाई हैद्राबादच्या भूमीवर झाली व त्या लढाईने भारतीय स्वातंत्र्य पूर्ण झाले. त्यामुळे त्या लढाईला तिचेच असे आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. ती घटनाच फार मोठी आहे. प्रचंड स्वरूपाची आहे. येथे त्या घटनेतील एखाद्या व्यक्तीस किंवा अनेक व्यक्तींना महत्त्व नाही. या विचाराने माझ्या मनातील वैयक्तिक भावनांचा निचरा झाला; आणि मग अगदी मोकळ्या मनाने मी लेखणी हातात घेतली व हे छोटेसे काम हातावेगळे केले. हे करीत असताना वैयक्तिक अंश यात येऊ न देण्याचा मी प्रयत्न केला आहे. तरीसुद्धा पूर्णपणे तो अंश मी टाळू शकलो नाही. त्याचे कारण वैयक्तिक बाब टाळण्याची माझी इच्छा नव्हती असे नाही, तर परिस्थितीचे स्वरूपच तसे होते.

हैद्राबादच्या जनतेच्या मुक्तीसाठी सुरू झालेल्या संग्रामात ज्या धीरवीरांनी

अनंत यातना सहन केल्या, त्यांना ही माझी नम्र सेवा मी अर्पण करतो. आपल्या बांधवांनी स्वातंत्र्यसौख्य अनुभवावे म्हणून ज्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले त्या असंख्य देशभक्तांना मी नम्र अभिवादन करतो. माझे सन्मान्य मित्र व सहकारी श्री. काशीनाथ जोशी यांनी मुद्रणप्रत तयार करण्यासाठी खूप श्रम घेतले नसते तर या आठवणी प्रकाशात आल्या नसत्या. श्री. जोशी हे स्वातंत्र्य आंदोलनातूनच आले असून माझ्याबरोबर गेल्या वीस वर्षांपासून काम करीत आहेत. त्यांनी हे माझे लिखाण कितीतरी वेळा पुन्हा पुन्हा टंकलिखित केले. त्यांनी मला केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

मी जी कामगिरी स्वीकारली तशा स्वरूपाची कामगिरी पार पाडण्यास धैर्याने पुढे येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने आपल्या माता-पित्याचा पूर्ववृत्तान्त, आपली वंशावळ आणि तशाच स्वरूपाच्या इतरही काही गोष्टींचा उल्लेख करावा अशी एक सर्वसाधारण प्रथा पडली आहे. या बाबतीत मला मात्र तो मार्ग अवलंबिता येत नाही. इतरांनी न चोखाळलेल्या अशा माझ्याच मार्गाने जाण्याचे माझ्या नशिबी आले आहे. फार फार वर्षांपूर्वी मी हे सारे संबंध तोडून टाकले आहेत. कुटुंब, वंश, पूर्वज, मूळ गाव, जात अन् प्रांत, इत्यादी शब्दांनी व्यक्त होणारे अर्थ, त्या शब्दांनी निहित असलेले सगळे भाव माझ्या बाबतीत आधीच पार उडून गेलेले आहेत, लुप्त झाले आहेत, विस्मृतीच्या गर्तेत गुप्त झालेल्या नात्यागोत्याच्या संबंधांना पुन्हा स्मृतिपटलावर आणण्याचा प्रयत्न करणे मला तसे थोडेसे अनावश्यकच वाटते. ठरावीक सर्वसामान्य चाकोरीतून खस्ता खात जाऊन काही मी आज जसा दिसतो तसा बनलो नाही, तर त्यासाठी मी मोठमोठ्या हनुमान उड्या घेतल्या. ज्याने स्वयंप्रेरणेने ब्रह्मचर्याश्रमातून एकदम चतुर्थाश्रमात पदार्पण केले अशा संन्याशाने कौटुंबिक नात्यागोत्यासंबंधी व इतर बाबींसंबंधी काही सांगणे अनावश्यक आहे. शिवाय मोठा असो किंवा लहान कोणत्याही माणसाच्या जीवनात काय आहे, त्याने स्वतःला व आपण ज्या परिसरात राहतो व कार्य करतो, त्या परिसराला कसे घडविले आहे या गोष्टीच महत्त्वाच्या आहेत. तो कुठे जन्मला व कुठे राहात होता या गोष्टींना महत्त्व नाही. म्हणून या सर्व गोष्टींचा उल्लेख न केल्याबद्दल मी क्षमेची याचना करतो.

एकच एक घटना वाचकांना जरा गमतीची वाटेल. माझा जन्म सर्वसामान्य पद्धतीचा असून थोडासा असाधारण वाटत आला आहे. माझ्या वडिलांनी तीन मुले झाल्यानंतर संन्यासधर्म स्वीकारला. काही काळ संन्याशाचे नेहमीचे भटके जीवन व्यतीत केल्यानंतर आपल्या गुरूच्या आज्ञेवरून त्यांनी पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारला व त्यांनी पुन्हा दुसऱ्यांदा गृहस्थाश्रमात पदार्पण केल्यानंतर माझा जन्म झाला. माझ्या वडिलांविषयी माझ्या मनात ज्या पुसट अशा स्मृती घुटमळत

आहेत त्यावरून असे दिसते की, पुन्हा गृहस्थी जीवनात प्रवेश केल्यानंतरसुद्धा गृहस्थ म्हणून करावी लागणारी सर्वसामान्य कर्तव्येही ते पार पाडू शकले नाहीत. कारण स्वतःच्याच अशा निराळ्या विश्वात ते वावरत होते. ही एक विशेष घटना वगळली तर, माझे बालपणही इतर सामान्य मुलांप्रमाणेच गेले.

स्वामी रामानन्द तीर्थ
हैद्राबाद
2 ऑक्टोबर 1966